# *निविदा प्रपत्र*

<u>कामाचे नांव</u> :– डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कृषि महाविद्यालय परिसरातील "मेघवर्षा" उपहारगृह भाडे तत्वावर चालविणेबाबत.

## UNIVERSITY ENGINEER, DR. P.D.K.V., AKOLA
## TENDER NOTICE No. 3, Year 2018-19

**No. UE/TENDER/513/2018,** **Dt. 15-06-2018.**

The sealed Tenders on payment of monthly rental basis excluding rent of premises, bills of electricity, water charges, rent of furniture and other articles being provided by the University are hereby invited for a period of two years to run the Meghvarsha canteen near Agril. College premises at Dr. P.D.K.V, Akola on lease basis for a period specified in Term & Condition. The blank Tender forms will be issued on any working day during the period as mentioned below on making cash payment of cost of Tender forms. The Earnest money as mentioned in Col. No.3 of table below will only be accepted in the form of fixed deposit receipt (F.D.R.) for the period of one year of any Nationalized or Scheduled Bank. No cash will be accepted on account of this. A separate envelope containing original F.D.R. Receipt, true copy of pan card should be accompanied with sealed Tenders otherwise the Tender will not be considered.

The detailed terms and conditions and blank tender form will be issued by the University Engineer, Dr. P.D.K.V., Akola on working days during office hours w.e.f. 07-06-2018 to 22-06-2018.

The offer shall remain valid upto 120 days from the date of opening of the tender. The tender will be accepted by the competent authority. The right to reject any or all tenders without assigning any reasons is reserved with the undersigned. In case of any dispute, the decision of the Hon. Vice-Chancellor, Dr. P.D.K.V., Akola will be final and binding to the both parties.

| Sr. No. | Name of Work | Earnest Money | Security Deposit | Cost of Blank Ten-der Form s | The period during which blank tender forms will be issued and time | Last date & time of receipt of sealed tenders by the University Enginner | Date and time of opening of the tenders |
|---|---|---|---|---|---|---|---|
| *1* | *2* | *3* | *4* | *5* | *6* | *7* | *8* |
| 1 | Running Meghvarsha canteen near Agril. College premises at Dr. P.D.K.V, Akola on the basis of lease for 2 years only. | 25,000 | 1,00,000 | 1,000 | 22-06-2018 upto 3.00 P.M. | 28-06-2018 upto 3.00 P.M. | 29-06-2018 at 11.00 A.M. |

**University Engineer**
**Dr. P.D.K.V., Akola**


E:\UNIV-ENG N BkUP\Tender\B1 T.N. 3 (B2)for Meghvarsha canteen 18-19.doc

**कृषी महाविद्यालय, अकोला परिसरातील ''मेघवर्षा'' विद्यार्थी उपहारगृह भाडे तत्वावर देणेबाबत शर्ती व अटी**

१. कृषी महाविद्यालय, अकोला परीसरात विद्यापीठाच्या मालकीची अनिवासी नुतनीकरण केलेल्या इमारतीमध्ये किचन, रूम बेसीन इ. व आवारभिंतीच्या आत खुल्या जागेवर लॉन तसेच पाणी व विद्युत पुरवठयासह इमारत कॅन्टीन सुरू करणेकरीता उपलब्ध राहील.

२. सदरहु इमारतीकरीता रूपये १,००,०००/— (एक लाख फक्त) सुरक्षा रक्कम विद्यापीठाकडे जमा करावी लागेल. कराराची मुदत संपल्यानंतर सदर रक्कम संबंधितास परत करण्यात येईल परंतु त्यावर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.

३. सदर कॅन्टीन करीता दरमहा रूपये १५०००/— (पंधरा हजार रूपये फक्त) किमान भाडे राहील व भाडेकरूस आकारण्यात आलेली रक्कम दरमहा पाच तारखेपर्यंत किंवा आगाउ एकरकमी विद्यापीठाकडे भरणा करावी लागेल.

४. निविदाधारकांनी निविदापत्रासोबत विद्यापीठ अभियंता, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नांवे असलेला राष्ट्रीयकृत बॅकेचा रूपये २५,०००/— (पंचवीस हजार फक्त) चा अनामत रकमेचा एफ.डी.आर. (१२ महिने कालावधीचा) निविदा सादर करते वेळी सोबत जोडावा. अस्विकृत निविदाधारकांना सदर एफ.डी.आर. परत करण्यात येईल.

५. विद्युत व पाणी पुरवठा शुल्क हे नियमीतपणे महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी विद्यापीठाकडे भाडेकरूस स्वंतत्रपणे भरावे लागेल. यास झालेल्या विलंबामुळे आलेल्या अडचणीस विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

६. सदर इमारत ही पुढील २ (दोन) वर्षाकरिता भाडे तत्वावर देण्यात येईल. या दरम्यान भाडेकरूचे काम समाधानकारक असल्यास सदर मुदत पुढे वाढवून देण्याचा अथवा फेर निविदा प्रक्रिया करण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राखीव राहील.

७. सदर इमारतीचा दुस—या व्यवसायासाठी उपयोग करता येणार नाही. त्यामध्ये फक्त उपहारगृह/हॉटेल व्यवसाय व त्यासंबंधीत वस्तुच ठेवाव्या लागतील इतर आक्षेपार्ह किंवा प्रतिबंधित वस्तु/द्रव्य सामुग्री, साहीत्य अथवा स्पोटक पदार्थ ठेवता येणार नाही. असे आढळल्यास पुर्व सुचना न देता करार संपुष्टात आणण्यात येईल.

८. सदर इमारतीमध्ये विद्यापीठाच्या पुर्वपरवानगीशिवाय कोणताही बदल अथवा बांधकाम करता येणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

९. सदर इमारतीमध्ये पोट भाडेकरू ठेवता येणार नाही. किंवा दुस—या व्यक्तीस अथवा व्यवसायास देता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास त्याच क्षणी सुरक्षा रक्कम कोणतीही पुर्वसुचना न देता जप्त करून करार संपुष्टात आणण्यात येईल.

१०. सदर ठिकाणी कोणताही वाद उद्‌भवल्यास मेसची इमारत रिक्त करून घेण्यात येईल. तसेच ताबा घेतांना इमारत ज्या स्थितीत होती त्याच स्थितीत स्वखुशीने परत करावी लागेल. या प्रसंगी विद्यापीठाच्या सुरक्षा रक्षकाकडुन सदर इमारत खाली करून घेण्यात येईल. व हा अधिकार विद्यापीठाकडे राखीव राहील.

११. उपरोक्त कालावधीत सदर व्यवसायावर विद्यापीठाकडून गठीत गुण व व्यवस्थापन समितीचे नियंत्रण राहील. सदर समितीने वेळोवेळी दिलेल्या सुचना भाडेकरूस बंधनकारक राहतील.

१२. विद्यापीठाकडून इमारतीशिवाय इतर कोणतेही साहित्य पुरविले जाणार नाही.

१३. इमारतीच्या आवारातील लॉन, फुल झाडे व इतर शोभिवंत झाडे यांना पाणी देणे व आजुबाजुचा परीसर नेहमी स्वच्छ व प्रसन्न राहील याची जबाबदारी भाडेकरूची राहील.

**लेखाधिकारी**
**बांधकाम विभाग**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला


E:\UNIV-ENG N BkUP\Tender\B1 T.N. 3 (B2)for Meghvarsha canteen 18-19.doc

१४. सदर कॅन्टीन ही विद्यापीठातील विद्यार्थी व कर्मचारी वर्ग यांच्या सुविधेसाठी उपलब्ध ठेवण्यात येत असल्यामुळे सदर मेसची वेळ सकाळी ७.०० ते रात्री ७.०० वाजेपर्यंत राहील. तसेच विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार रविवारी सुध्दा सदर कॅन्टीन सुरू ठेवावी लागेल.

१५. विद्यार्थी व कर्मचारी वर्ग यांचेशी व्यवसायासंबधीत देणी–घेणी उधारी याबाबत अथवा इतर कोणतेही कारणावरून वादविवाद होणार नाही याची मेस चालकास खबरदारी घ्यावी लागेल.

१६. सदर व्यवसाय हा आरोग्याशी निगडीत असल्यामुळे कॅन्टीनमध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तु जसे चहा, नास्ता, शितपेये इ. मालाचा दर्जा उत्तम राहील तसेच त्याचे दर हे बाजारपेठेतील दराच्या तुलनेत रास्त ठेवावे लागतील व गुणवत्ता नियंत्रण व व्यवस्थापन समिती वेळोवेळी अंदाज घेत राहील.

१७. सदर इमारत किंवा त्याठिकाणी इतर कोणतेही नुकसान झाल्यास उपरोक्त सुरक्षा रक्कमेतून झालेल्या नुकसानाचे मुल्यांकन करून तेवढी रक्कम परस्पर वळती करण्यात येईल व त्याचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राखीव राहतील.

१८. कॅन्टीन भाडयाने घेण्याकरीता सादर केलेल्या दाव्यासोबत सर्व आवश्यक कायदेशीर प्रमाणपत्रे जसे अन्न व ओषधी प्रशासनाकडून निर्गमीत प्रमाणपत्र, विक्रीकर, आयकर या सह इतर आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

१९. कॅन्टीनमध्ये कामगार कायद्यानुसार बाल कामगार कामावर ठेवता येणार नाही. तसेच किमान वेतन कायद्यानुसार संबंधीतांना वेतन दिल्या जाईल याची दक्षता घ्यावी व अश्या प्रकरणी कोणताही वाद उद्‌भवल्यास त्यास विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

२०. इमारतीमध्ये कोणतीही चोरी, नैसर्गिक आपत्ती आग, शॉर्टसर्कीट व इतर पासुन हानी झाल्यास त्याची कोणतीही नुकसान भरपाई विद्यापीठाकडून दिल्या जाणार नाही.

२१. व्यवसायानुरूप निघत असलेला घान कचरा, धुर, सांडपाणी याची नियोजीत ठिकाणी विल्लेवाट लावावी यावर गुणवत्ता नियंत्रण व व्यवस्थापन समितीची देखरेख राहील.

२२. उपरोक्त कालावधीत विद्यापीठाने नियुक्त केलेल्या गुणवत्ता नियंत्रण व व्यवस्थापन समितीकडून कोणत्याही क्षणी तपासणी केल्यास त्या ठिकाणी निदर्शनास आलेली परिस्थिती ही अंतिम राहील व त्याप्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी शिफारस करण्याचे अधिकार फक्त समितीस राहतील.

२३. निविदेमध्ये दिलेली किंमत ही दरमहा असल्याचा स्पष्ट उल्लेख करावा.

२४. कॅन्टीनमधील भाडेकरू अधिनस्त काम करणा–या व्यक्तींना एका पोशाखात असणे आवश्यक राहील.

२५. कॅन्टीनमध्ये शुध्द पीण्याचा पाण्याचा पुरवठा करण्याकरिता पाणी शुध्द करणारे मशीन (R.O.) वगैरे लावून शुध्द पाणी पुरविणे आवश्यक राहील. तसेच शुध्द पाण्याच्या बॉटल्स् जसे बिसलरी कंपनीच्या ठेवणे आवश्यक राहील व वापरण्यात येणा–या बॉटल्स् कालबाहय (Expiry dated) झालेल्या नसाव्यात याची दक्षता घेण्यात यावी.

२६. कॅन्टीनमधील खाद्य पदार्थाबाबत मंजुरी घेवूनच दर्जेदार खाद्य पदार्थ ठेवावे किंवा तयार करावे. तसेच ठेवण्यात आलेल्या खाद्यपदार्थांची यादी दरासह फलक (Rate Board) लावणे अनिवार्य राहील.

२७. कॅन्टीनमधील स्वयंपाकगृहात स्वच्छता पाळणे अनिवार्य राहील.

२८. कॅन्टीनमुळे विद्यापीठाच्या घाणपाणी वाहुन नेणा–या पाईप लाईन, चेबंर्स इ. चोक झाल्यास हे काम भाडे करूणे करावे.

२९. घान व ओल्या कच–याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावावी.

३०. कॅन्टीनमध्ये वापरण्यात येणारा खाद्य पुरवठा, पदार्थ इ. ची माहेवार तपासनी अन्न निरीक्षण यांचेकडून भाडेकरूस करावी लागेल.



लेखाधिकारी
बांधकाम विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

३१. कॅन्टीनमध्ये खाजगी कार्यक्रम/पाटर्या घेण्यात येवू नयेत.

३२. कॅन्टीनचा मासिक विद्युत बिलाचा नियमीत भरणा भाडेकरूने करावा.

३३. करारनाम्याचे कालावधीत जेंव्हा विद्यापीठास इमारतीची आवश्यकता भासेल तेंव्हा लेखी पुर्व सुचना दिल्यानंतर १ महीण्याचे आत भाडेकरूस इमारत रिक्त करून दयावी लागेल. तसेच भाडेकरूस इमारत रिक्त करावयाची असल्यास १ महीण्याची सोडत पुर्व सुचना देवून इमारत रिक्त करता येईल.

३४. वरिल अटिंपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल व भाडेकरूकडून खाली इमारतीचा ताबा मागण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

३५. करारनामा व त्यानुसार उपरोक्त शर्ती व अटी हया उपहारगृह चालकास बंधनकारक राहतील. करारनामा रूपये ५००/— चे स्टॅपपेपरवर नोटरी करून घ्यावा लागेल त्याचे उल्लंघन झाल्यास पुढील कारवाई करण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाकडे राखीव राहील.

३६. दरमहा भाडयाची रक्कम तिन महीन्यापर्यंत थकीत राहील्यास सदर भाडे करारनामा संपुष्टात आणण्यात येईल.

३७. उपरोक्त नमुद शर्ती व अटीस अनुसरून मी उपहारगृह रू. /— प्रतीमाह भाडयाने घेण्यास तयार आहे व करारनामा करण्यास तयार आहे.

३८. डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत स्थापीत डॉ. पंजाबराव देशमुख स्पर्धा परीक्षा मंचाद्वारे समिती स्थापन करण्यात येवून यांचेकडून कॅन्टीनबाबत येणा—या तक्रारी, सल्ला, ई. बाबत सुध्दा उपहारगृहमालकास नियमीतपणे लक्ष दयावे लागेल. तसेच याबाबत दखल न घेतल्यास उपहारगृह १ महीण्याचे आत रीक्त करून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३९. कॅन्टीनमध्ये ठेवण्यात येणारे पदार्थ व त्यांचा दर्जा सुध्दा स्पर्धा परीक्षा मंचाद्वारे मंजुर करून घ्यावा व विद्यार्थीचे मागणीनुसार आवश्यक पदार्थ, वस्तु ई. वेळोवेळी ठेवण्यात याव्यात.

४०. उपरोक्त कॅन्टीन करीता करावयाचा करारनामा नेमुन दिलेला कालावधी वाढवून देण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

**(करारनामा लिहुन घेणार)** **(करारनामा लिहुन देणार)**

**संपुर्ण नांव :— विद्यापीठ अभियंता डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**संपुर्ण नांव :— ______________________**

**पत्ता व दुरध्वनी क्र. अथवा भ्रमणध्वनी क्र. :— ______________________**

______________________

**लेखाधिकारी**
**बांधकाम विभाग**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**साक्षीदार**

१) ______________________ **संपुर्ण नांव :—** ______________________

२) ______________________ **संपुर्ण नांव :—** ______________________